# अगस्ती सहकारी साखर कारखाना लि.अगस्तीनगर

ता.अकोले, जि.अहमदनगर

ग्राम – अगस्तिसाखर, अकोले E-Mail ID - agastisakhar@rediffmail.com
फोन नंबर : (०२४२४) २२२७७५, २२२७१४. फॅक्स नंबर : (०२४२४) २२३२८३

## • परिपत्रक •

आपले कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद / शेतकरी बंधूंना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपले कारखान्याचे कार्यक्षेत्रातील ऊस पिकावर सततचा पाऊस व ढगाळ हवामान तसेच हवेतील वाढलेले बाष्प आणि धुक्यामुळे उभ्या ऊस पिकावर तसेच नवीन लागणीच्या ऊस पिकावर तांबेरा सदृष्य ''ब्राऊन स्पॉट'' या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. या रोगामुळे ऊस उत्पादनात ३५% ते ४०% घट होत असल्याने ऊस उत्पादकांनी या रोगाची लक्षणे जाणून घेवून खालीलप्रमाणे उपाय योजना कराव्यात.

### रोगाची लक्षणे :

- तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव ऊसाच्या पानावर आढळतो.
- पानांवर वर्तुळाकार व तांबड्या रंगाचे ठिपके दिसून येतात.
- पानांच्या खालील बाजूस तांबड्या रंगाची भुकटी बाहेर पडताना दिसते.
- रोगाची तीव्रता वाढल्यास पाने तांबूस होवून वाळतात.
- या रोगाचा प्रसार हवेद्वारे होतो.
- ऊस पक्वतेच्या काळात या रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यास पानामध्ये साखर तयार करण्याचे कार्य मंदावते, त्यामुळे साखर उताऱ्यात घट होते.
- २६५ या ऊस जातीवर विशेष प्रादुर्भाव दिसून येतो.

### उपाय योजना :

- डायथेन झेड–७८ किंवा एम–४५, (३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारावे)

किंवा

- कॉपर ओक्सिक्लोराईड ५०% (३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारावे)

वरील बुरशीनाशकाची १० दिवसांच्या अंतराने स्टिकर प्रति लिटर १ मिली वापरून फवारणी करावी. अधिक माहितीसाठी कारखान्याचे शेतकी व ऊस विकास विभाग / कारखाना गट कार्यालयाशी संपर्क साधावा, ही नम्र विनंती.

कळावे.

आपले विनीत

| | | |
|---|---|---|
| **बी. एस. घुले** | **सिताराम पा. गायकर** | **मधुकररावजी पिचड** |
| कार्यकारी संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |

**व सर्व सन्माननीय संचालक मंडळ**

अगस्ति सहकारी साखर कारखाना लि., अगस्तिनगर, ता.अकोले, जि. अहमदनगर

॥ सुजाता ॥ ऑफसेट, सारडा पेट्रोल पंपामागे, अकोले ☎ २२१३३१

PC : F : Paripatrak 30 Oct 2017